'Maharashtra Times' 25.02.2020

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई । मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२०

# सई परांजपे यांना साहित्य अकादमी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



ज्येष्ठ लेखिका आणि चित्रपट दिग्दर्शिका सई परांजपे यांना 'आणि मग एक दिवस' या अनुवादित पुस्तकासाठी २०१९ या वर्षाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शहा यांनी लिहिलेल्या 'अँड देन वन डे' या इंग्रजी पुस्तकाचा हा अनुवाद आहे.

➤ सर्वोत्कृष्ट अनुवादित पुस्तक...७

# 'आणि मग एक दिवस' सर्वोत्कृष्ट अनुवादित पुस्तक

**पुणे :** ज्येष्ठ लेखिका आणि चित्रपट दिग्दर्शिका सई परांजपे यांच्या 'आणि मग एक दिवस' या पुस्तकाला साहित्य अकादमीतर्फे मराठी भाषेतील सर्वोत्कृष्ट अनुवादित पुस्तक म्हणून निवडण्यात आले आहे. त्यासाठी परांजपे यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रुपये, ताम्रपत्र असे आहे.

साहित्य अकादमीचे सचिव डॉ. के. श्रीनिवासराव यांनी २३ प्रादेशिक भाषांतील विविध साहित्य प्रकारातील सर्वोत्कृष्ट अनुवादित साहित्यकृती व लेखकांच्या नावांची घोषणा सोमवारी केली. मराठी अनुवाद साहित्यातील पुस्तक निवड समितीमध्ये ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे, जयंत पवार आणि निशिकांत ठकार यांचा समावेश होता. 'पहिल्याच अनुवादित पुस्तकाला पुरस्कार जाहीर झाल्याने अत्यंत आनंद होत आहे,' अशी भावना सई परांजपे यांनी व्यक्त केली आहे.

'नसीरने माझ्या 'स्पर्श' चित्रपटात काम केले आहे. या चित्रपटादरम्यानचे किस्से त्याने या पुस्तकात लिहिले होते. तेच त्याने वाचून दाखवले आणि याचे मी मराठीत भाषांतर करावे, अशी इच्छा व्यक्त केली. मी कधीही अनुवाद केला नव्हता. तरीही त्याने आग्रह केला. पुस्तक वाचल्यानंतर मात्र, मी अनुवाद करायचे ठरवले. आणि 'आणि मग एक दिवस'चा जन्म झाला', असा किस्सा परांजपे यांनी सांगितला.

❝

**मी अनुवाद करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता आणि त्याला साहित्य अकादमी पुरस्कार मिळेल, असे वाटले नव्हते; पण हा खरेच मोठा सन्मान असून, त्यासाठी मी अकादमीचे आभार मानते. हा अनुवाद करताना एक मनस्वी आनंद होता. अनेक जुन्या आठवणींना यामुळे उजळाही मिळाला.**

**– सई परांजपे,**
ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शिका

'Loksatta' 25.02.2020

लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM ७


मुंबई, मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२० ★

## अनुवादासाठी २३ भाषांतील कलाकृतींचा सन्मान


# सई परांजपे यांना साहित्य अकादमी पुरस्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** रंगकर्मी आणि चित्रपट दिग्दर्शिका अशी ख्याती असलेल्या मराठी प्रांगणातील बुजूर्ग लेखिका सई परांजपे यांना यंदाचा अनुवादासाठी दिला जाणारा मानाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. परांजपे यांनी चतुरस्त्र अभिनेते नसिरुद्दीन शाह यांच्या आत्मचरित्राच्या 'आणि मग एक दिवस' या नावाने मराठीत केलेल्या अनुवादाचा गौरव करण्यात आला.



### 'आणि मग एक दिवस'मध्ये काय आहे?



नसिरुद्दीन शाह व्यावसायिक चित्रपटांसोबत समांतर धारेतील चित्रपटांसाठीही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या आत्मकथनात आत्मप्रौढी येत नाही. ते तटस्थपणे आपल्याच ऱ्हासाकडे आणि कारनाम्यांकडे पाहत चिंतन करताना दिसतात. अशी अलिप्तता आत्मकथनांमधून सध्या आढळत नाही. मराठीत 'आणि मग एक दिवस' नावाने ते प्रसिद्ध झाल्यापासून त्याची चर्चा आणि कौतुक बरेच दिवस रंगले होते. एवढेच नव्हे तर विश्राम बेडेकरांच्या 'एक झाड, दोन पक्षी' या आत्मकथनासारखे ते प्रांजळ असल्याचे बोलले जात होते. आपल्या पुस्तकाचा मराठी अनुवाद सई परांजपे यांनीच करावा असा आग्रह नसिरुद्दीन शाह यांनी धरला होता.

साहित्य अकादमीच्या मुख्यालयात डॉ. चंद्रशेखर कंबार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. २०१९ साठी अनुवादासाठी विविध भाषांसाठी एकूण २३ पुस्तकांची निवड करण्यात आली. मराठीसाठी दीर्घकथाकार भारत सासणे, बदलती महानगरीय संवेदना साहित्यातून पकडणारे जयंत पवार आणि हाडाचे कवी-साहित्यिक निशिकांत ठकार यांच्या त्रिसदस्यीय समितीने सई परांजपे यांच्या ग्रंथाची निवड केली.

५० हजार रुपये आणि ताम्रपट असे पुरस्काराचे स्वरूप असून लवकरच दिल्लीत होणाऱ्या सोहळ्यात तो प्रदान करण्यात येणार आहे.

'Sakal' 25.02.2020

सकाळ मुंबई, मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२०

# सई परांजपे यांना भाषांतर पुरस्कार जाहीर

नवी दिल्ली : विख्यात निर्मात्या-दिग्दर्शिका सई परांजपे यांना २०१९ या वर्षाचा साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार जाहीर झाला. ज्येष्ठ अभिनेते नसिरुद्दीन शाह यांच्या 'अँड देन वन डे' या आत्मचरित्राच्या मराठी अनुवादाबद्दल (आणि मग एक दिवस) परांजपे यांना हा सन्मान जाहीर झाला. साहित्य अकादमीचे सचिव डॉ. के. श्रीनिवासराव यांनी ही माहिती निवेदनाद्वारे दिली.

सई परांजपे को साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार
https://www.bhaskarhindi.com/city/news/sahi-paranjpe-gets-sahitya-akademi-translation-award-110773

साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार
http://www.univarta.com/announcement-of-sahitya-puraskar-to-translators-of-23-works-including-gora/india/news/1897809.html

सई परांजपे यांना साहित्य अकादमी पुरस्कार |
https://loksatta.com/mumbai-news/sai-paranjape-sahitya-akademi-award-akp-94-2093138/

सई परांजपे यांना साहित्य अकादमी
https://maharashtratimes.indiatimes.com/maharashtra/pune-news/sai-paranjape-to-sahitya-akademi/articleshow/74290145.cms

जम्मू-कश्मीरः बसोत्रा और जौहर को साहित्य अकादमी का अनुवाद पुरस्कार
https://www.amarujala.com/jammu/bashindey/jammu-kashmir-basotra-and-johar-translation-award-sahitya-akademi